BHIWANDI NIZAMPUR
CITY MUNCIPAL CORPORATION
BHIWANDI (DIST- THANE)
OLD S.T.STAND KAP-ALI
BHIWANDI – ४२१ ३०२,DIST-THANE

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी,जि.ठाणे,महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड,कापआळी,
भिवंडी - ४२१ ३०२,जि.ठाणे

TEL : ०२५२२-२५५३१४/२५५३१५,FAX : ०२५२२-२५२०७४,e mail – bncmc.cd.@gmail.com

जा.क्र./भिनिशमनपा/आयुक्त कार्या./१५०/२०२१.
दिनांक :- २०/०७/२०२१.

## आदेश

**विषय :- बकरी ईद सणानिमित्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये ३८ तात्पुरते कत्तलखाने उभारण्याचे आदेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याबाबत..**

**संदर्भ :- १. जा.क्र./भिनिशमनपा/मार्केट/३८२/२०२१ दिनांक १५/०७/२०२१ रोजीचे आदेश.**
**२. ॲड. नारायण आर. बुबना यांचे आज दिनांक २०/०७/२०२१ रोजी सायं. ५:१७ वाजताचे ई-मेलद्वारे प्राप्त निर्देश.**
**३. गृह विभाग महाराष्ट्र शासनाचे दिआयएस-०६२१/प्र.क्र.१४३/विशा-१ब/दि.२ जुलै २०२१.**

आज दिनांक २०/०७/२०२१ रोजी दुपारी ४:३० वाजता CRPIL ST / ११०३८/२०२१ मध्ये ऑनलाईन सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाने संदर्भ क्र. १ अन्वये ३८ तात्पुरते कत्तलखाने उभारण्याच्या आदेशास स्थगिती देऊन मान्यता प्राप्त कत्तलखान्या बाहेर कत्तल करणे अनुज्ञेय राहणार नाही असे आदेश दिले आहेत. संदर्भ क्र. २ नुसार महापालिकेच्या विधीज्ञांकडुन याबाबत मेलद्वारे सुचना प्राप्त झाली या पार्श्वभूमीवर मा. उच्च न्यायालयाचे आदेशाचे अनुपालन सर्व संबधितांनी करणे आवश्यक आहे यासाठी संदर्भ क्र. १ चे आदेश स्थगित झाल्याने त्या अनुषंगाने देण्यात आलेले सर्व आदेश रद्द करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी शासनाचे गृह विभागाच्या परिपत्रकानुसार शक्यतो प्रतिकात्मक कुर्बानी करावी व सहकार्य करावे.

आरोग्याच्या दृष्टीने शहरातील आवश्यक ती स्वच्छता राखण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्व संबंधित विभागांनी आवश्यक ती पर्यायी व्यवस्था करुन आरोग्य व स्वच्छता सुरळीत ठेवण्यासाठी कार्यवाही करावी.

पोलीस उपायुक्त यांनी मा. उच्च न्यायालयाचे तसेच गृह विभागाच्या आदेशाचे अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करावी.

20/07/2021
(सुधाकर देशमुख)
आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

प्रत:-

१) मा. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३) मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
४) मा. आयुक्त पशुसंवर्धन विभाग, पुणे
५) मा. पोलीस आयुक्त, ठाणे
६) मा. जिल्हाधिकारी, ठाणे
७) मा. महापौर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

८) मा. उपमहापौर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
९) प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, मुंबई विभाग
१०) पोलीस उपायुक्त, भिवंडी
११) उपायुक्त, पशुसंवर्धन, ठाणे
१२) संबंधित विभाग प्रमुख, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
१३) जनसंपर्क अधिकारी, प्रसिध्दीसाठी